# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ८२८ /२०२४-२५ दिनांक : १७/१२/२०२४

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.
(धोकादायक झाडे/ विकासकामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे/ विकासकामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

17.12.2024

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ८२८ /२०२४-२५

दिनांक : १७/१२/२०२४

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

**१) साहिल इंटरप्रायजेस इंडीया प्रा.लि. यांचे दि.११/११/२०२४ रोजीचे पत्र.**

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | गुलमोहर | ३० ते ३५ फुट | ०१ | २० | सदरचे झाड हरीभक्ती कंपाऊड घोडबंदर रोड, मिरारोड (पु.) येथिल साहिल इंटरप्रायजेस इंडीया प्रा.लि. येथे कंपनीच्या कंपाऊडच्या मध्ये असून झाडाच्या फांद्याची उंची वाढल्याने व झाडाचा वरचा भागाचा भार जास्त वाढल्याने झाड हे रस्त्याच्या दिशेने झुकलेले आहे. झाड हे कंपाऊडच्या सुरक्षा भिंतीवरील पत्र्यावर वाकलेले असल्याने पत्रे पुर्ण तुटलेले आहे. झाडाचा खालचा भाग पोकळ होऊन त्याची मुळे वरती आलेली असल्याने जमिन उकळलेली दिसत आहे. तसेच कंपाऊड च्या बाहेर मुख्य वाहतुकीचा घोडबंदर रस्ता असल्याने वाहतुकीची वरदळ जास्त आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

**२) कार्यकारी अभियंता- बांधकाम/विद्युत विभाग यांचे दि.१२/१२/२०२४ रोजीचे पत्र.**

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | वड | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्षे | सदरची झाडे मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील निलकमल नाका ते मनाली व्हिलेज पर्यत गटार बांधणे, सी. सी. रस्ता तयार करण्याचे काम एम. एम. आर. डी. ए. मार्फत सुरु आहे. सदर कामाच्या आखणी मध्ये ०६ नग झाडे बाधित होत असून सदर झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | काटेरी चिंच | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्षे | |
| ३ | गुलमोहर | ३० ते ३५ फुट | ०१ | १० वर्षे | |
| ४ | कडुलिंब | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्षे | |
| ५ | उंबर | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्षे | |
| ६ | जंगली झाड | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्षे | |

**३) मिरारोड (पु.) पेणकरपाडा पाडुरंगवाडी येथील धोकादायक झाड काढणे.**
**ठेका उद्यान अधिक्षक यांची दि.०२/१२/२०२४ रोजीची पाहणी अहवाल.**

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेल्ट्रोफॉर्म | ३५ ते ४० फुट | ०१ | १० वर्षे | सदर झाड मिरारोड (पु) पेणकरपाडा पाडुरंगवाडी मा. नगरसेवक सोनार मॅडम ऑफिस समोर असून रस्त्याचे काम करताना झाडाच्या मुळया वरती येवून झाड एका बाजूस पुर्णपणे झुकलेले आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

17.12.2024

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका